# उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) रस्ते प्रकल्प, यवतमाळ यांचे कार्यालय

जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत सिव्हील लाईन्स, यवतमाळ ४४५००१

दूरध्वनी क्र:- ०७२३२-२४०११८ ई.मेल:- dycorpzp@gmail.com

फक्स क्र:- ०७३३२-२४२२११

क्रमांक/उपजी/भूस.रप्र/कली/कावी/54 /2016 दिनांक :-24/11/2016

** कलम – 19 **

## ~ अधिसुचना ~

(भूमी संपादन पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013)
भूं.स.प्र.क्र. - 44/47/2009-10 मौजे - तळेगांव ता. यवतमाळ जि. यवतमाळ

ज्याअर्थी समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 (2013 चा 30) (या पुढे ज्याचा निर्देश उक्त अधीनियम असा केला आहे.) यांचा कलम 11 च्या पोट कलम (1) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना क्र. प्र.अ./भूंस/रप्र./कली/कावि.१०९/२०१५ दिनांक. ०४/०६/२०१५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्या द्वारे असे अधिसूचित आहे की, या सोबत जोडलेल्या आनुसुची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे. किंवा तिची गरज भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी यवतमाळ जिल्हाधिकाऱ्याने कलम – 15 च्या पोट कलम (2) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम – 19 च्या पोटकलम (1) च्या तरतुदी मध्ये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचा कलम -3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्याची उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) रस्ते प्रकल्प् यवतमाळ जिल्हा यवतमाळ यांना पदनिर्देशित करीत आहे.

### ** अनुसूची - एक **

### ~ संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन ~

गांव – तळेगांव तालुका – यवतमाळ जिल्हा - यवतमाळ

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| 1 | 104/1 | 0.05 |
| 2 | 104/2 | 0.17 |
| 3 | 103 | 0.37 |
| 4 | 102 | 0.16 |
| 5 | 100 | 0.43 |
| 6 | 79/1पै. | 4.17 |
| 7 | 107 | 0.07 |